21-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/20/2025 11:43 PM Page 1



आगोंदनंतर मोरजी, आश्वे, मांद्रेतील शॅक व्यवसायिकांमध्ये चिंता पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




चॅम्पियन्स ट्रॉफी संघाला ५८ कोटींचे रोख बक्षीस पान ४ वर


वेर्णा, शुक्रवार, २१ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 198 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 21 March 2025 | Pages 4 | ₹ 4


# विश्वजित राणे यांच्या राजीनाम्यासाठी तीव्र निदर्शने

## राणे यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी होईपर्यंत स्वाक्षरी मोहीम सुरु ठेवणार : सामाजिक कार्यकर्त्यांचा निर्धार

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २० : नगर नियोजन मंत्री विश्वजित राणे यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, अन्यथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन हा विषय धसास लावू, असा इशारा गोव्यातील ज्येष्ठ सामाजिक आणि पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी दिला आहे. गुरुवारी पणजीतील चर्च स्क्वेअरवर शेकडो निदर्शकांनी एकत्र येत विश्वजित राणे यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली.**

निदर्शकांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना लिहिलेल्या आणि स्वाक्षरी केलेल्या निवेदनात तीन प्रमुख आरोप लावण्यात आले आहेत. कलम १७ (२)चा बेकायदेशीर रित्या वापर करून करून २०२३ ते २०२५ दरम्यान सुमारे २५ लाख चौरस मीटर जमिनीचे रूपांतर केले गेले. झोन बदलाशी संबंधित नियम कलम ३९ (अ) हा नवा नियम लावून झोन बदलले गेले ज्याला गोवा फाउंडेशनने न्यायालयात आव्हान दिले आहे. त्याशिवाय डिचोलीमधील लोढा प्रकल्पाशी विश्वजित राणे यांचा थेट संबंध असल्याचा आरोपही या आंदोलकांनी केला.

कार्यकर्ता स्वप्नेश शेर्लेकर यांनी निदर्शकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांना लिहिलेले निवेदन वाचून दाखवले.





# बनावट अनुभव प्रमाणपत्रे प्रकरणाची चौकशी पूर्ण करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : ऑल गोवा प्रायव्हेट बस ओनर्स असोसिएशनने राज्य सरकारला नोटीस बजावत ३६ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांच्या भरतीमध्ये बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर केल्याच्या आरोपाची शिस्तभंग चौकशी तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

आरटीआय कार्यकर्ते सुदीप तामणकर यांनी १५ दिवसांच्या आत या एएमव्हीआयंविरुद्ध कारवाई करून त्यांना सरकारी सेवेतून निलंबित करण्याची मागणी केली आहे. कारवाई न झाल्यास उच्च न्यायालयात न्यायालय अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुख्य सचिव, वाहतूक सचिव आणि परिवहन संचालकांना ही नोटीस पाठवण्यात आली आहे. तामणकर यांनी सांगितले की, त्यांनी यापूर्वी चार वेळा यासंदर्भात विभागाला नोटीस पाठवल्या आहेत, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. २०१२ पासून सुरू असलेला हा प्रश्न आता सोडवावा लागेल, असे तामणकर म्हणाले.

तामणकर यांच्या मते, डिसेंबर २०१० मध्ये सरकारने एएमव्हीआयच्या १४ पदांसाठी जाहिरात दिली होती. मात्र, २०१२ मध्ये प्रत्यक्षात २९ एएमव्हीआयंची भरती झाली, जे भारतीय संविधानाच्या कलम १४ आणि १६ (१) चे उल्लंघन होते. त्यानंतर आणखी नऊ एएमव्हीआयंची भरती झाली, त्यापैकी अनेकांनी बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर केली. तक्रारींनंतर सरकारने दोन एएमव्हीआयंच्या सेवा रद्द केल्या होत्या. दक्षता विभागाने चौकशीत या ३६ एएमव्हीआयंविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची शिफारस केली होती.

तामणकर म्हणाले की, या प्रकरणामुळे २०१९ पासून हे ३६ एएमव्हीआय प्रोबेशनवर आहेत. त्यामुळे सात एएमव्हीआयंच्या दुसऱ्या बॅचच्या पदोन्नती लांबणीवर पडल्या आहेत. तसेच, विभागात एमव्हीआयच्या १९ पदे रिक्त असून, या प्रलंबित चौकशीमुळे ती भरली गेलेली नाहीत. तामणकर यांनी २०१२ मध्ये उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. त्यानंतर सरकारने विभागीय चौकशीसाठी वेळ मागितला. ऑक्टोबर २०१४ मध्ये

पान २ ▶

## निवडक

### विरोधी पक्षनेत्याच्या अटकेनंतर तुर्कीत निदर्शने

इस्तांबूलचे महापौर आणि विरोधी पक्षनेते एकरेम इमामोग्लू यांच्या अटकेनंतर तुर्कीमध्ये निदर्शने सुरू झाली आहेत. निदर्शक रस्त्यावर, विद्यापीठांमध्ये आणि मेट्रो स्थानकांवर सरकारविरोधी घोषणा देत आहेत. अनेक ठिकाणी निदर्शक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाल्याचे वृत्त आहे. प्रत्युत्तरादाखल, सरकारने देशातील सर्वात मोठे शहर इस्तंबूलमध्ये ४ दिवसांसाठी सार्वजनिक मेळाव्यांवर बंदी घातली आहे. यासोबतच अनेक रस्ते आणि मेट्रो मार्ग देखील बंद करण्यात आले आहेत. पोलिसांनी १०० हून अधिक लोकांना ताब्यात घेतले आहे. यामध्ये अनेक नेते आणि पत्रकारांचा समावेश आहे. २२ वर्षांपासून सत्तेत असलेल्या राष्ट्रपती एर्दोगान यांच्याविरोधातील हे सर्वात मोठे निदर्शने मानले जात आहे. इमामोग्लू (५४) हे आधुनिक तुर्कीचे संस्थापक मुस्तफा केमाल पाशा यांच्या रिपब्लिकन पीपल्स पार्टीचे नेते आहेत. २३ मार्च रोजी त्यांना राष्ट्रपतीपदाचे उमेदवार घोषित केले जाणार होते. पण त्याआधीच त्यांना भ्रष्टाचार आणि दहशतवादी संघटनेला मदत केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली.

---

### दोन चकमकींमध्ये एक जवान, २२ माओवादी ठार

**रायपूर, दि. २०** : छत्तीसगडमधील बस्तर भागात गुरुवारी झालेल्या दोन चकमकीत एक जवान आणि २२ माओवादी ठार झाले आहेत. दंतेवाडा सीमेजवळील विजापूर जिल्ह्यातील गंगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात माओवादी असल्याची माहिती मिळाली होती. याआधारे सुरक्षा दलांनी सकाळी ७ वाजता कारवाई सुरू केली तेव्हा पहिली चकमक झाली. बस्तर रेंजचे आयजीपी सुंदरराज पी यांनी सांगितले की, दांतेवाडाच्या सीमेजवळ बिजापूर जिल्हातील गंगालूर ठाण्याअंतर्गत येणाऱ्या जंगल परिसरात माओवादी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. सुरक्षा दलाच्या शोधमोहिमदरम्यान सकाळी सात वाजता चकमक सुरू झाली.

---

### अमेरिकेत भारतीय विद्यार्थ्यावर कारवाई

**वॉशिंग्टन, दि. २०** : अमेरिकेतली जॉर्डटाऊन विद्यापीठातील संशोधक बदर खान सुरी यांना इमिग्रेशन अधिकाऱ्यानी हमासशी संबंध असल्याच्या आरोपावरून ताब्यात घेतले आहे. देशातील महाविद्यालयांच्या आवारातील आंदोलनकर्त्यांविरोधात ट्रम्प प्रशासनाने उघडलेल्या माहिमेच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे. बदर खान सुरी यांचे माहिती असलेल्या किंवा संशयित दहशतवाद्यांशी जवळचे संबंध असल्याचे बोलले जात आहे, असे गृह सुरक्षा विभागाच्या सहाय्यक सचिव ट्रिसिया मॅकलॉघलिन यांनी सांगितले. तसेच सुरी हा जॉर्जटाऊन विद्यापीठात फॉरेन एक्सचेंज स्टूडंट होता आणि तो सक्रियपणे सोशल मीडियावर प्रोपगंडा आणि अँटिसेमिटिझम पसरवत होता, अशा माहिती ट्रिसिया मॅकलॉघलिन यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये दिली आहे. याबरोबरच सुरी याचे हमासच्या वरिष्ठ सल्लागार असलेल्या एका संशयीत दहशदतवाद्याबरोबर जवळचे संबध आहेत. परराष्ट्र सचिवांनी १५ रोजी एक निर्णय जारी केला आहे, ज्यानुसार सुरीच्या कारवाया आणि अमेरिकेतील त्याचे वास्तव्य यामुळे तो एएनए कलम २३७(र)(४)(सी)(आय)अंतर्गत देशातून काढून टाकण्यासाठी पात्र ठरवते, असेही त्यांनी सांगितले आहे.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# स्टेडियम भाडयाने देण्याचा सरकारचा निर्णय

## स्मार्ट वीज मीटर बसवण्याच्या प्रकल्पाला मंजूरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २०** : डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी स्टेडियम १० वर्षांसाठी पीपीपी (पब्लिक–प्रायव्हेट पार्टनरशिप) मॉडेलवर भाड्याने देण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मंत्रीमंडळाच्या गुरुवारच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी ही माहिती दिली. हे स्टेडियम डोम एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड यांना भाड्याने देण्यात येणार आहे. या करारातून राज्य सरकारला दरमहा २५ लाख रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय, राज्य सरकारच्या कार्यक्रमांसाठी हे स्टेडियम मोफत उपलब्ध असेल, असे मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले.



राज्य मंत्रिमंडळाने गोव्यात ७.५ लाख स्मार्ट वीज मीटर बसवण्याच्या प्रकल्पाला देखील मंजुरी दिली आहे. डिजिस्मार्ट नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेडला या प्रकल्पासाठी सेवा प्रदाता म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, प्रथम टप्प्यात फक्त व्यावसायिक आस्थापनांमध्ये स्मार्ट मीटर बसवले जातील. हा प्रकल्प तीन टप्प्यांत राबवला जाईल आणि नंतर वैयक्तिक घरगुती मीटर बसवण्याची प्रक्रिया सुरू होईल.केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने गोव्यासाठी स्मार्ट मीटर प्रकल्पासाठी ४६७ कोटी रुपये मंजूर केले आहेत. सुधारित वितरण योजना अंतर्गत या प्रकल्पाची सुरुवातीची अंमलबजावणी मार्च २०२३ मध्ये अपेक्षित होती, मात्र ती मार्च २०२४ पर्यंत वाढविण्यात आली. स्मार्ट मीटर रिअल–टाइम डेटावर आधारित असतील. ऊर्जा वापर, व्होल्टेज आणि सध्याच्या पातळीच्या नोंदी घेतल्या जातील. तसेच वीज गुणवत्ता, लोड शेड्यूलिंग, मागणी व्यवस्थापन आणि दोष विश्लेषणासाठी हा डेटा वापरण्यात येईल.

विकास भारत २०४७'च्या धर्तीवर गोवा सरकारने विकास गोवा २०३७ साध्य करण्यासाठी एक व्यापक व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. रोजगार, पर्यावरण, शेती, मानवी विकास यांसारख्या प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी गुरुवारी दिली.

मुख्यमंत्री सावंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, मंत्रिमंडळाने विकास गोवा २०३७ प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्यासाठी जनतेकडून सूचना मागविण्यात येणार आहेत.राज्य सरकारने हे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी हैदराबादस्थित कॉर्पोरेट चाणक्य सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची नियुक्ती केली आहे. कृषी, अर्थव्यवस्था, आरोग्य, शिक्षण, संलग्न सेवा, पर्यटन आणि पर्यावरण यासह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, विभाग प्रमुख आणि भागधारकांशी सल्लामसलत करून आवश्यक माहिती संकलित केली जाईल.



# २२ झोपड्यांवर कारवाई; रहिवाशांचा आक्रोश

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २०** : फोंडा दिवाणी न्यायालयाच्या आदेशानंतर बांदोडा पंचायतीच्या शापूर येथील प्रभाग ११ मधील २२ झोपड्यांवर बुधवारी दिवसभर कारवाई करत तोडफोड करण्यात आली. या झोपड्यांमध्ये रहिवासी अनेक वर्षांपासून राहत होते. मुल्ला कुटुंबियांनी २००३ मध्ये या झोपड्या पाडण्याची याचिका दाखल केली होती.

पंधरा दिवसांपूर्वी न्यायालयाने या बेकायदेशीर झोपड्या पाडण्याचे आदेश दिले होते. मात्र, स्थानिक सरपंच रामचंद्र नाईक आणि माजी सरपंच राजेश नाईक यांच्या विनंतीवरून ही कारवाई पंधरा दिवसांसाठी स्थगित करण्यात आली होती, जेणेकरून झोपडीधारकांना पर्यायी व्यवस्था करण्यासाठी वेळ मिळावा. न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार बुधवारी ही कारवाई करण्यात आली. घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

तोडफोडीच्या वेळी परिसरात तणाव निर्माण झाला. झोपड्या गमावलेल्या रहिवाशांनी आक्रोश व्यक्त केला. एका ७० वर्षीय महिलेने आपल्या उद्ध्वस्त झोपडीच्या ढिगाऱ्यावर बसून माध्यमांशी संवाद साधताना वेदनेने विचारले, आम्ही बेघर झालो असताना तुम्ही आमचे फोटो का काढत आहात ? आम्हाला आता कोण मदत करणार ?

झोपडीधारकांनी आरोप केला की, सफा मशिदीच्या परिसरात शंभरहून अधिक झोपड्या आहेत, ज्या ऐतिहासिक संरक्षित स्थळाच्या १०० मीटरच्या आत आहेत. आमच्याकडे आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्र असूनही आम्हाला बेघर केले जात आहे, अशी भावना झोपडीधारकांनी व्यक्त केली. गेल्या वर्षी हेराल्डने या झोपडपट्टीतील दयनीय परिस्थितीवर आणि मूलभूत सुविधांच्या अभावावर प्रकाश टाकला होता.

# पीडितेच्या खाजगी भागाला स्पर्श करणे बलात्काराचा प्रयत्न नाही

## अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय | सामाजिक कार्यकर्त्यांकडून नाराजी

**प्रयागराज, दि. २० :**

अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका महत्त्वाच्या निर्णयात स्पष्ट केले की, पीडितेच्या खाजगी भागाला स्पर्श करणे आणि तिच्या पायजमाची तार फाडणे हे बलात्कार किंवा बलात्काराचा प्रयत्न म्हणून गणले जाऊ शकत नाही. मात्र, न्यायालयाने हे कृत्य गंभीर लैंगिक अत्याचाराच्या श्रेणीत येत असल्याचे नमूद केले आहे. हा निर्णय उत्तर प्रदेशातील कासगंज येथे २०२१ मध्ये घडलेल्या घटनेशी संबंधित आहे, ज्यामध्ये एका अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन झाल्याचा आरोप करण्यात आला होता.

हे प्रकरण कासगंज जिल्ह्यातील पटियाली पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील आहे.

१० नोव्हेंबर २०२१ रोजी सायंकाळी ५ वाजता पीडितेची आई आणि तिची १४ वर्षांची मुलगी गावातून परतत असताना पवन, आकाश आणि अशोक नावाचे तिघे आरोपी मोटारसायकलवरून त्यांच्या वाटेत आले. पवनने पीडितेला घरी सोडण्याचे आश्वासन दिले आणि आईच्या परवानगीने पीडिता त्यांच्यासोबत गेली. मात्र, वाटेत मोटारसायकल थांबवून तिघांनी मुलीशी गैरवर्तन केले. पवनने तिच्या खाजगी भागाला हात लावला आणि पायजमा फाडण्याचा प्रयत्न केला. मुलीच्या आरडाओरडीनंतर सतीश आणि भुरे नावाच्या दोन व्यक्तींनी मदतीसाठी धाव घेतली, मात्र आरोपींनी त्यांना बंदुकीचा धाक दाखवून पळ काढला. मुलीच्या आईने पवनचे वडील अशोक यांच्याकडे तक्रार केली, मात्र तिला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर तिने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, परंतु पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही.

या प्रकरणी मुलीच्या आईने कासगंजच्या विशेष न्यायाधीशांच्या न्यायालयात 'पॉक्सो ' कायद्यांतर्गत खटला दाखल केला होता. आरोपींवर आयपीसी कलम ३७६ (बलात्कार), पॉक्सो कायद्याचे कलम १८ (गुन्हा करण्याचा प्रयत्न) आणि कलम ५०४ आणि ५०६ (शब्दद्वारे धमकी देणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सतीश आणि भुरे यांनी न्यायालयात प्रत्यक्षदर्शी म्हणून साक्ष दिली होती. मात्र, आरोपींनी उच्च न्यायालयात खटल्याला आव्हान दिले.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेत आरोपींवर बलात्काराच्या प्रयत्नाचा आरोप सिद्ध होत नसल्याचे स्पष्ट केले. न्यायमूर्ती राम मनोहर नारायण मिश्रा यांच्या खंडपीठाने म्हटले की, बलात्काराच्या प्रयत्नाचा गुन्हा सिद्ध होण्यासाठी आरोपीने पीडितेवर बलात्कार करण्याच्या स्पष्ट हेतूने कृती केल्याचे सिद्ध करणे आवश्यक आहे. केवळ शरीराला स्पर्श करणे किंवा पायजमा फाडण्याचा प्रयत्न करणे हे बलात्काराच्या प्रयत्नासाठी पुरेसे नाही. मात्र, हे कृत्य गंभीर लैंगिक अत्याचारांतर्गत येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला आयपीसी कलम ३५४ (बी) (महिलेच्या कपड्यांना स्पर्श करून विनयभंग) आणि पॉक्सो कायद्याच्या कलम ९ आणि १० (उत्तरित लैंगिक अत्याचार) अंतर्गत आरोपींवर खटला चालवण्याचे निर्देश दिले.

न्यायालयाने म्हटले की, बलात्काराचा प्रयत्न आणि लैंगिक अत्याचार यामध्ये स्पष्ट भेद केला पाहिजे. आरोपींनी पीडितेच्या शरीराला हात लावला असला आणि पायजमा फाडण्याचा प्रयत्न केला असला, तरी हे बलात्काराच्या प्रयत्नात मोडत नाही. मात्र, हे कृत्य लैंगिक अत्याचाराच्या श्रेणीत येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

काँग्रेसच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेट यांनी या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला. या देशातील महिलांच्या सुरक्षेसाठी बनवलेल्या कायद्यांकडून काय अपेक्षा ठेवायच्या? असे त्या म्हणाल्या . लखनऊ विद्यापीठाच्या माजी कुलगुरू आणि सामाजिक कार्यकर्त्या रुपरेखा वर्मा यांनी या निर्णयाला निराशाजनक आणि अपमानास्पद म्हणत टीका केली. समाजातील सर्वात वाईट घटकांचे रक्षण करण्यासाठी न्यायमूर्तींनी असा संकुचित भेद वापरणे अत्यंत गंभीर आहे.असे त्यांनी म्हटले. वकील सायमा खान यांनीही न्यायालयाच्या दृष्टिकोनावर प्रश्न उपस्थित केला. भारतीय कायद्यात, कोणताही गुन्हेगारी प्रयत्न हा संपूर्ण गुन्हा मानला जातो. हेतू स्पष्ट असताना आणि गुन्ह्याकडे ठोस पावले उचलली असताना त्याला बलात्काराचा प्रयत्न मानले पाहिजे. असे त्या म्हणाल्या.

यापूर्वी २०२१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्किन–टू–स्किन कॉन्टॅक्ट वर आधारित निर्णय दिला होता, जो सर्वोच्च न्यायालयाने नंतर रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते की लैंगिक हेतूने मुलाच्या लैंगिक अवयवांना स्पर्श करणे हे पॉक्सो कायद्याच्या कलम ७ अंतर्गत लैंगिक हिंसा मानले जाईल, जरी त्वचेशी संपर्क नसला तरीही हेतू महत्त्वाचा आहे.

या प्रकरणावर निर्णय देताना भारतीय दंड संहिता) च्या तरतुदींचा वापर करण्यात आला, कारण हा गुन्हा 'बीएनएस' (भारतीय न्याय संहिता) लागू होण्यापूर्वी घडला होता. बीएनएस अंतर्गत कलम ६३ (बलात्काराचा प्रयत्न) आणि कलम ७९ (महिलेच्या कपड्यांचा अपमान किंवा विनयभंग) अंतर्गत अशा प्रकारच्या घटनांवर कठोर कारवाईची तरतूद आहे. हा निर्णय सामाजिक स्तरावर मोठ्या चर्चेचा विषय ठरला आहे. या निर्णयामुळे न्यायालयीन प्रक्रियेतील असंवेदनशीलता आणि कायद्यातील त्रुटी यावर जोर दिला जात आहे. या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल होण्याची शक्यता असून, सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.